महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्र. कल्याण-०२१९/प्र.क्र.१४१/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १७ जून २०१९.

विषय :- सन २०१९-२० या वित्तीय वर्षात गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, ११३, पोलीस कर्मचारीवर्ग यांचे कल्याण, या लेखाशीर्षाखाली लेखानुदानाद्वारे मंजूर अनुदान खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.

२) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २८-ए/ ४९३७/ लेखा-अनुदान-(२०१९-२०)/ १२०-(१८)/ २०१९, दिनांक २२.०५.२०१९.

३) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २८-ए/ ४९३७/ लेखा-अनुदान-(२०१८-१९)/ १५३-(१७)/ २०१९, दिनांक १२.०६.२०१९.

ज्ञापन.

महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९ (सन २०१९ चा महा. अधि. क्र.२) द्वारे एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ या कालावधीकरिता अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा निधी (लेखानुदान) अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर प्रशासनिक विभागांना वितरित करण्यात आला आहे. उक्त निधी तात्काळ वाटप करण्याबाबत शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ द्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

२. त्या अनुसार, गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, ११३, पोलीस कर्मचारीवर्ग यांचे कल्याण, या लेखाशीर्षाखाली पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मधील उपशीर्षाखाली, स्तंभ (३) मधील उद्दिष्टाकरिता, स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम खर्च करण्यास, त्यापुढील अटींवर, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे:-

अ.क्र. (१)	उपशीर्ष (२)	उद्दिष्ट (३)	मंजूर निधी (लेखानुदान) (४)
१.	(००) (००)(०१) पोलीस कल्याण निधीसाठी अंशदान (अनिवार्य) (२०५५०२६६)	३२-अंशदाने	रु.१६,६४,०००/-
२.	(००) (००)(०२) पोलीस कर्मचाऱ्यांना अर्थसहाय्यित दराने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा (अनिवार्य) (२०५५०२७५)	३३-अर्थसहाय्य	रु.१,००,०००/-

अ.क्र. *(१)*	उपशीर्ष *(२)*	उद्दिष्ट *(३)*	मंजूर निधी (लेखानुदान) *(४)*
३.	(००) (००)(०३) पोलीस क्रीडा निधीसाठी अंशदान (अनिवार्य) (२०५५०२८४)	३२-अंशदाने	रु.३३,३३,०००/-
४.	(००) (००)(०४) कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या पोलीसांना आणि मृत पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना अनुदान (अनिवार्य) (२०५५०२९३).	३१-सहायक अंशदाने (वेतनेतर)	रु.३,००,००,०००/-

<u>अटी</u>-

१) उक्त निधी खर्च करताना, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५, द्वारे विहित करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, भाग-१, यामधील नियमांचे अनुपालन करावे.

२) उक्त निधीतून कार्यालयीन खरेदी करताना, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६, द्वारे विहित करण्यात आलेल्या *"शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियम पुस्तिका,"* यामधील नियमांचे अनुपालन करावे.

३) उक्त निधीचे उपयोजन प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

४) उक्त निधीच्या खर्चाबाबतचे अभिलेख लेखापरीक्षेकरिता उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

३. परिच्छेद २ मधील तक्त्यातील स्तंभ (४) मधील रकमा ह्या अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर पोलीस महासंचालक, म.रा., यांना वितरित करण्यात आल्या आहेत.

४. परिच्छेद २ मधील तक्त्यातील स्तंभ (४) मधील रकमा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढण्याच्या प्रयोजनासाठी अपर पोलीस महासंचालक (धोरण), म.रा., यांना नियंत्रक अधिकारी आणि पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (लेखा-१), पोलीस महासंचालक, म.रा., यांचे कार्यालय, मुंबई, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून, याद्वारे, घोषित करण्यात येत आहे.

५. हे ज्ञापन, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९, अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०६१७११४८५४७८२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627,
postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e
, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.06.17 12:25:03 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक,
म.रा., मुंबई.

प्रत-

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
४) प्रधान महा लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महा लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (अर्थसं.-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).